**<u>ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या वेळी कर्तव्यावर असताना मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना, गंभीर जखमी/ कायमचे अपंगत्व आलेल्या कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत</u>.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः ग्रापनि-२०१५/प्र.क्र. ९६/पंरा-२**
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ
मुंबई ४०० ००१
तारीख: २० जून २०१६

<u>प्रस्तावना :-</u>

१. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी कर्तव्यावर असताना कर्मचा-याचा/अधिका-याचा कर्तव्यकालामध्ये मृत्यृ झाल्यास अथवा त्याला कायमस्वरुपी अंपगत्व आल्यास संबंधित कर्मचा-याच्या/अधिका-याच्या वारसांना खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदान उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णयः-**

२. राज्यात, राज्य निवडणुक आयोगाच्या आदेशानुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुकांच्या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या परंतु कर्तव्यावर कार्यरत असताना मृत झालेल्या कर्मचा-यांच्या/अधिका-यांच्या वारसांना तसेच कायम स्वरुपी अपंगत्व आलेल्या अधिकारी/कर्मचा-यांना खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | सानुग्रह अनुदान रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | निवडणुकीच्या कर्तव्यात असताना मृत पावलेले अधिकारी/कर्मचारी यांचे वारस | १०,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| २ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया, नक्षलवाद्दयाच्या कारवाया यात बॉम्बस्फोट, सुरुंग अथवा शस्त्रस्त्रांचा हल्ला ( Road Mines, Bomb Blast, Armed Attack etc.) यामध्ये मृत पावलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे वारस | २०,००,०००/- |
| ३ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना कायम स्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी/कर्मचारी (जसे हात/पाय/ डोळा गमविणे इ. | ५,००,०००/- |
| ४ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया, नक्षलवाद्दयाच्या कारवाया यात बॉम्बस्फोट, सुरुंग अथवा शस्त्राचा हल्ला (Road Mines, Bomb Blast, Armed Attack etc.) यामध्ये कायम स्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी/कर्मचारी (जसे हात/पाय/डोळा गमविणे इ.) | १०,००,०००/- |

**अटी व शर्ती** :-

३. या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निवडणुक कर्तव्य याचा अर्थ संबंधित कर्मचारी हा निवडणुकीच्या कर्तव्यासाठी आपल्या कार्यालयातुन/घरातुन बाहेर पडल्यापासुन तो निवडणुकीशी संबंधित कर्तव्ये पार पाडून आपल्या कार्यालयात/घरी परत येईपर्यतचा कालावधी असा समजण्यात यावा. निवडणुकीशी संबंधित कर्तव्ये यामध्ये निवडणुकीच्या कामासाठी दिल्या जाणा-या प्रशिक्षणाचा देखिल समावेश असेल या कालावधीमध्ये कोणतीही दुर्घटना घडल्यास ती निवडणुक कर्तव्यावर असताना घडलेली आहे असे समजण्यात येईल. तथापि, निवडणुक कर्तव्य व घडलेली दुर्देवी घटना यामध्ये नैमित्तिक संबंध (Casual Connection) असावा.

४. निवडणुक कर्तव्यार्थ नियुक्त अधिकारी/कर्मचारी यामध्ये राज्य शासन, केंद्र शासन, निम शासकिय, इतर प्राधिकरण तसेच इतर खाजगी आस्थापना की ज्यातील अधिकारी/कर्मचारी

यांच्या सेवा निवडणुकीच्या कामासाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत असे अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश आहे.

५. हे सानुग्रह अनुदान शासनाच्या प्रमाणित सोयी सुविधा, अनुज्ञेय आर्थिक लाभ या व्यतिरिक्त आहे. यामध्ये सदर अधिकारी/कर्मचारी यांना मिळणा-या नियमीत लाभांचा समावेश नाही.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये नमुद केलेल्या सर्व निवडणुकांसाठी लागु राहील.

७. सदर सानुग्रह अनुदानाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी यांचेस्तरावरुन सादर करणे आवश्यक राहील.

८. सदर सानुग्रह अनुदान अधिकारी/कर्मचारी यांना अथवा त्यांच्या कुटुंबियांना दयावयाच्या आर्थिक मदतीसाठी येणारा खर्च हा मागणी" क्र एल-२, जिल्हा प्रशासन ०९३ जिल्हा आस्थापना-राज्यक्षेत्र-(०४) निवडणूका संबंधातील खर्च (एक) ग्रामपंचायत निवडणुक, (०४) (०१) ग्रामपंचायतींच्या व विभागीय ग्रामपंचायत मंडळाच्या निवडणुकासंबंधातील खर्च (२०५३ ०५४७), १३ कार्यालयीन खर्च (योजनेत्तर), व एल-२, २०५३ जिल्हा प्रशासन, (०२) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुकांबाबतचा खर्च, (०२)(०१) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुकाबाबतचा खर्च (२०५३ ०५२९) दत्तमत (योजनेत्तर) (राज्यक्षेत्र)" या लेखाशिर्षाखाली टाकण्यात यावा व त्या त्या वर्षाच्या मंजुर अनुदानातुन भागविण्यात यावा.

९. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनोपचारिक संदर्भ क्र. १८६/२०१६ व दिनांक ११ एप्रिल २०१६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमती नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक १ जानेवारी, २०१५ पासून लागू होईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०६२०१२२२३९५४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay R Bankar

Digitally signed by Sanjay R Bankar
DN: CN = Sanjay R Bankar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = RDD
Reason: I am approving this document
Date: 2016.06.22 16:13:32 +05'30'

**(संजय बनकर)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री याचे सचिव,
३) मा. मंत्री/मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
४) मा.सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई,
५) प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई.(पत्राने),
६) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई.(पत्राने),
७) प्रबंधक, लोक आयुक्त व उपायुक्त यांचे कार्यालय, मुंबई. (पत्राने),
८) सर्व मंत्रालयीन विभागाचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव,
९) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई,
१०) विभागीय आयुक्त, सर्व,
११) जिल्हाधिकारी, सर्व,
१२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१३) महालेखापाल, महाराष्ट्र १/२(लेखा व अनुज्ञेयता) मुंबई,

१४) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व परिक्षण) मुंबई, नागपूर,

१५) जिल्हा लेखा कोषागार अधिकारी, सर्व,

१६) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई (दोन प्रती)

१७) कार्यासन क्रमांक वित्त-१, वित्त-७ व वित्त-८, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,

१८) वित्त विभाग (अर्थसंकल्प १७ व व्यय-१५), मंत्रालय, मुंबई,

१९) निवड नस्ती कार्यासन क्र. पंरा-२, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.